# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर -४१६ ००४.

**Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,**
**Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur-416 004**

**Phones: Chairman** 2690829 **Secretary** 2691405 **PBX** – [0231] 2696101, 2696102, 2696103
**E-Mail:** divsec.kop@gmail.com **Website :** sscboardkolhapur.in


क्र.कोविमं / भांडार / उत्तरपत्रिका वितरण / एप्रिल-मे २०२१ / 111 दिनांक १० / ०४ / २०२१

**परीक्षा प्राधान्य/महत्वाचे**

प्रति,
मुख्याध्यापक / केंद्रसंचालक,
माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा एप्रिल-मे २०२१
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय :** माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा एप्रिल मे २०२१ या परीक्षेच्या उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख, नकाशा, होलोक्राफ्ट स्टिकर्स वापरण्याबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, एप्रिल मे २०२१ माध्यमिक शालांन्त प्रमाणापत्र परीक्षेसाठी लागणाऱ्या उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख, नकाशा, होलोक्राफ्ट स्टीकर्स इत्यादी साहित्य हस्तपोहोच पाठविण्यात आले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे

**** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १० वी ) ****

१. **२० पानी बारकोड असलेल्या उत्तरपत्रिका (निळी शाई)**

सदरच्या २० पानी बारकोड असलेल्या उत्तरपत्रिका सर्व माध्यमांच्या विषयांना विद्यार्थ्यांना द्यावयाच्या आहेत. सदर उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना देण्याअगोदर आतील पाने कमी जास्त, मळकट, अपूरी सुटलेली फाटलेली व क्रमवार नसलेली पानांची उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना दिली जाणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. सर्व माध्यमांची विद्यार्थी संख्या विचारात घेऊन उत्तरपत्रिकांचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

२. **४ पानी बारकोड असलेली पुरवणी (निळी शाई)**

सर्व माध्यमाच्या सर्व विषयांच्या विद्यार्थ्यांना ४ पानी पुरवण्यांचा आवश्यकतेनुसार पुरवठा करण्यात यावा.

३. **४ पानी बारकोड असलेली आलेख पुरवणी (निळी शाई)**

सदरची आलेख पुरवणी फक्त बीजगणित या विषयासाठी विद्यार्थ्यांना द्यावयाची आहे. केंद्रावरील विद्यार्थी संख्या विचारात घेवून सदर पुरवणीचा पुरवठा करण्यात आलेला आहे. ज्यावेळी विद्यार्थी दुसऱ्या आलेख पुरवणीची मागणी करतील, त्याचवेळी विद्यार्थ्यास दुसरी आलेख पुरवणी देण्यात यावी. याबाबत पर्यवेक्षकांना योग्य त्या सूचना देण्यात याव्यात.

४. **४ पानी बारकोड असलेली नकाशा पुरवणी (निळी शाई)**

सदरची नकाशा पुरवणी भूगोल विषयासाठी विद्यार्थ्यांना द्यावयाची आहे. केंद्रावरील विद्यार्थी संख्या विचारात घेवून सदर पुरवणीचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

(कृ.मा.प.)

५. **ड्रॉईग शीट (निळी शाई)**

सदरची ड्रॉईगशीट टेक्निकल (X१, ९१, ९२) विषयासाठी विद्यार्थ्यांना द्यावयाची आहे. केंद्रावरील विद्यार्थी संख्या विचारात घेवून सदर ड्रॉईग शीटचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

६. **काळे होलोक्राफ्ट स्टिकर्स (HOLOCAFT STICKERS)**

उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख, नकाशे इत्यादीवर होलोक्राफ्ट स्टिकर्स चिकटवताना ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक, केंद्र क्रमांक इत्यादी माहिती आहे अशा ठिकाणी न चुकता होलोक्राफ्ट स्टिकर्स चिकटवण्यात यावा, जेणे करुन गोपनीयतेचा भंग होणार नाही. तशा सूचना पर्यवेक्षकांनाही देण्यात याव्यात.

वरील साहित्य ताब्यात मिळताच साहित्याची त्वरीत मोजदाद करुन घ्यावी. साहित्याची मोजदाद करुन न घेतल्याने आलेख, नकाशा, पुरवण्या, उत्तरपत्रिका इत्यादी साहित्य पेपरच्या दिवशी फोनवरुन मागणी केली जाते व त्यामुळे कार्यालयाची अडचण होते. तरी याबाबत आपण स्वत:सर्व साहित्य ताब्यात मिळताच त्वरीत मोजून घ्यावे. कमी पडत असल्यास साहित्य तात्काळ आपल्या प्रतिनिधी मार्फत मागवून घ्यावे. उत्तरपत्रिकेवर पृष्ठ क्रमांक चुकले असतील किंवा खराब, फाटलेल्या असतील तर त्या वेगळ्या ठेवाव्यात त्याचा वापर करु नये.

**(महत्वाची सूचना)**

**२० पानी बारकोड असलेल्या उत्तरपत्रिका, आलेख, नकाशे, पुरवण्या इत्यादी मोठया प्रमाणात छपाई करुन घ्यावी लागते. त्यामुळे उत्तरपत्रिकांमध्ये पानांची संख्या कमी अगर जास्त असणे, छपाई अस्पष्ट, शिलाई व्यवस्थित नसलेल्या, मळकट अशा उत्तरपत्रिकांचा पुरवठा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी अशा प्रकारच्या उत्तरपत्रिका, पुरवण्या व नकाशा पुरवणी विद्यार्थ्यांना देण्यापूर्वी उत्तरपत्रिकांची तपासणी करून चांगल्या स्थितीत असलेल्या उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख व नकाशा पुरवण्यांचा विद्यार्थ्यांना पुरवठा करण्यात यावा. जेणेकरुन विद्यार्थ्यांची अडचण होणार नाही. तसेच शिक्के मारण्यात आलेल्या व लिहिलेल्या उत्तरपत्रिका, पुरवण्या कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांला दिली जाणार नाही, याबाबत दक्षता घेणेबाबत सबंधित स्टेशनरी सुपरवायझर, ब्लॉक सुपरवायझर यांना सूचना देण्यात याव्यात.**

**आपल्या परिरक्षक केंद्रावर जादा उत्तरपत्रिका व स्टेशनरी साहित्य ठेवण्यात आलेले आहे. जर परीक्षेची स्टेशनरी अथवा उत्तरपत्रिका कमी पडल्यास आपल्या परिरक्षक केंद्राकडून घेण्यात याव्यात.**

वरील प्रमाणे २० पानी उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख / नकाशे व होलोक्राफ्ट स्टिकर्स पाठविण्यात येत असून ते सुयोग्य रित्या वितरित करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपणांवर राहील, याची नोंद घ्यावी.

सदर सूचनांप्रमाणेच साहित्य (उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख, नकाशे इ.) वापरावयाचे आहे. **आपल्या केंद्रावर जर या पूर्वीच्या परीक्षेचे साहित्य शिल्लक असेल तर ते कोणत्याही परिस्थितीत वापरु नये**. तसे आढळल्यास त्याबाबत आपणांस जबाबदार धरण्यात येईल, याची गांर्भीयाने नोंद घ्यावी.

**(देविदास कुलाळ)**
प्र. विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**टिप : परीक्षा संपताच शिल्लक असणारे सर्व साहित्य (उदा. उत्तरपत्रिका, पुरवणी, नकाशे व आलेख इ.) व्यवस्थितरित्या गठ्ठे बांधून आपल्या संबंधित परिरक्षक कार्यालयात यादीसह जमा करावे व जमा केलेल्या शिल्लक साहित्याचा अहवाल मंडळास ०८ (आठ) दिवसात न चुकता पाठवावे. तसेच केंद्रावर परीक्षेचे कोणतेही साहित्य शिल्लक नसलेचे निरंक प्रमाणपत्रही सादर करावे.**

प्रत माहितीस्तव : १) सर्व परिरक्षक - सातारा / सांगली / कोल्हापूर जिल्हे
२) सर्व मुख्याध्यापक, सातारा / सांगली / कोल्हापूर जिल्हे